अति. महापालिका आयुक्त (वि.) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा. क्र. अतिमआवि/सविवि/२५८८
दि. ०२/०९/२०२०

# कार्यालयीन परिपत्रक

**विषय :- स्वच्छ सर्वेक्षण २०२० करीता पुणे मनपा प्रभाग निहाय स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धा आयोजित करणेबाबत.**

संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/६६७ दि.२१/१२/२०१९

स्वच्छ सर्वेक्षण २०२० करीता पुणे मनपा प्रभाग निहाय स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धा आयोजित करणेकरीता मा. महापालिका आयुक्त यांनी संदर्भांकित ठरावान्वये मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्यांमार्फत कार्यवाही करावी.

पुणे महानगरपालिका मार्फत स्वच्छ सर्वेक्षण २०२० अंतर्गत पुणे मनपा प्रभागनिहाय स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धा आयोजित करणेत येत आहे. यामध्ये स्वच्छता विषयक जाणीव जागृती करणेकरीता विविध कार्यक्रम, उपक्रम, स्पर्धा पारितोषिक वितरण कार्यक्रम आयोजित करणेत येणार आहे. त्यानुसार पुणे शहरातील झोपडपट्टीतील/ वस्तीतील स्थानिक मंडळ, बचत गट, शेजार समूह गट इ. लोकसहभाग होणार आहे.

सदर स्पर्धेचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

१. स्वच्छ झोपडपट्टी संदर्भांत बैठका, प्रचार फेरी, प्रभात फेरी व तत्सम उपक्रम वस्तीमार्फत आयोजित करून जाणीव जागृती करणे.
२. स्पर्धा कालावधीत ओला व सुका कचरा प्रत्येक कुटुंबाने वेगळा करून ठेवणे व वेगळा देणे.
३. ओला व सुका कचरा प्रत्येक घरटी कचरा वेचकांकडे देणे अथवा कलेक्शन सेंटर वर देणे.
४. पुणे महानगरपालिकेच्या स्वच्छता ॲपवर शेजार समूह गट/बचत गट/स्थानिक मंडळ यांची नोंद करणे व वस्ती पातळीवर नागरिकांना स्वच्छता ॲपचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित करणे.
५. सार्वजनिक शौचालयाचा वापर करणे. तसेच वस्तीतील इतर नागरिकांना प्रोत्साहित करणे.
६. सार्वजनिक स्वच्छता अभियान (श्रमदान) राबविणे.
७. प्रतिबंधीत प्लॅस्टिकचा वापर न करणे.
८. पाण्याचा वापर काटकसरीने करणे.

स्पर्धा स्वरूप प्रमाणे कार्यवाही करणेची सर्व जबाबदारी ही क्षेत्रिय कार्यालय प्रमुखांची राहील. तसेच या सर्व गोष्टींची विभाग निहाय पाहणी करणेसाठी संबधित परिमंडळ प्रमुख जबाबदार राहतील. या सर्व कार्यक्रमाचा अहवाल संबंधित परिमंडळ प्रमुखांनी मा. सह महापालिका आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे सादर करणे आहे.

**अ. विषयांकित प्रकरणी सर्व क्षेत्रिय कार्यालयांमार्फत करावयाची कार्यवाही –**

१. पुणे महानगरपालिका सर्व क्षेत्रिय कार्यालयामार्फत स्वच्छ सर्वेक्षण २०२० अंतर्गत पुणे मनपा प्रभागनिहाय स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धा घेणे.
२. यामध्ये स्वच्छता विषयक जाणीव जागृती करणेकरीता विविध कार्यक्रम, उपक्रम आयोजित करणे.
३. स्पर्धेसाठी आवश्यक साहित्य उदा. झाडु, खराटे वगैरे व तदनुषंगिक आवश्यक साहित्य पुरविणे.

...२//

४. स्पर्धेमध्ये सहभागी बचत गटांना आवश्यक असणारे साहित्य, वस्तीमधील/सार्वजनिक/पुणे महानगरपालिकेच्या इमारतीमध्ये रंगरंगोटी अथवा भित्तीचित्रे काढण्यासाठी (उदा. रंग, ब्रश इ.) उपलब्ध करून देणे.

५. स्पर्धे अंतर्गत क्षेत्रिय कार्यालय निहाय समिती गठीत करून त्या मार्फत स्वच्छता विषयक कामांची पाहणी करणे. तसेच संबंधित क्षेत्रिय कार्यालयातील मा. सभासदांमार्फत उत्स्फुर्त प्रतिसाद घेणे.

६. क्षेत्रिय कार्यालयांमार्फत झोपडपट्यांची प्रथम, द्वितीय, तृत्तीय व उत्तेजनार्थ क्रमांकाने निवड करून घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे यादी पाठविणे आहे.

पुणे महानगरपालिका क्षेत्रिय कार्यालयामार्फत विषयांकित प्रकरणी वरील 'अ' प्रमाणे कार्यक्रम, जाणीव जागृती करणे करीता आवश्यक खर्चा करीता पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडील सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील ४ ब महिला बाल कल्याण योजना निधी अंतर्गत FE14C142 (शेजार समुहगट व इतर महिलांसाठी विविध स्पर्धा उपक्रम घेणे) या अर्थशिर्षकावर रक्कम रू.२० लाख असून त्यामधून रक्कम रू. १० लाख व FE14C219 (स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धा, झोपडपट्टीत घनकचरा व्यवस्थापनाचे उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना पारितोषिक देणे) या अर्थशिर्षकावर रक्कम रू.२० लाख तरतूद उपलब्ध असून त्यामधून रक्कम रू. २० लाख असे एकूण रक्कम रू.३० लाख १५ क्षेत्रिय कार्यालयांना विभागून प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयास रक्कम रू.०२ लाखापर्यंत लॉकींग द्वारे रक्कम उपलब्ध करून देणेत येईल.

**ब. विषयांकित प्रकरणी समाज विकास विभागामार्फत करावयाची कार्यवाही –**

१. स्पर्धेची वातावरण निर्मिती व जाणीव जागृती करणे आवश्यक आहे. त्याकरीता समाज विकास विभागामार्फत पथनाट्य, वस्ती पातळीवर तज्ञ व्यक्तींचे व्याख्यान, हँडबील, पोस्टर्स इ. द्वारे स्पर्धेची वातावरण निर्मिती व जाणीव जागृती करणे.

२. ओला-सुका कचरा वेगळा करणे व ओला कचरा प्रक्रिया करणेबाबत जाणीव जागृतीसाठी हॅन्ड बिल वाटप करणे व पोस्टर्स लावणे तसेच या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेमार्फत प्रत्येक प्रभागात तज्ञ व्यक्तींमार्फत जाणीव जागृतीचे कार्यक्रम तसेच मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करणे.

३. याकरीता शॉर्ट टेंडर पद्धतीने तातडीची निविदा (EOI) मागवून संस्थेची निवड करून त्यांचे मार्फत जाणीव जागृती करणे.

समाज विकास विभागामार्फत विषयांकित प्रकरणी वरील 'ब' प्रमाणे कार्यक्रम, जाणीव जागृती करणे करीता आवश्यक खर्चा करीता पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागाकडील सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील ४ ब महिला बाल कल्याण योजना निधी अंतर्गत FE14C142 (शेजार समुहगट व इतर महिलांसाठी विविध स्पर्धा उपक्रम घेणे) या अर्थशिर्षकावर रक्कम रू.२० लाख उपलब्ध असून त्यामधून रक्कम रू.१० लाख खर्च करणेत यावा.

**क. विषयांकित प्रकरणी घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत करावयाची कार्यवाही –**

१. स्पर्धेत क्षेत्रिय कार्यालयामार्फत निवड करणेत आलेल्या झोपडपट्ट्यांची पाहणी करणेकरीता शहर पातळीवरील समितीमार्फत पुणे शहरातून प्रथम, द्वितीय, तृतीय, उत्तेजनार्थ क्रमांकाने निवड करणे.

२. स्पर्धेचा बक्षीस वितरण कार्यक्रम आयोजित करणे.

तसेच या व्यतिरिक्त स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धेकरीता घनकचरा व्यवस्थापन विभागाकडुन RE19A153/SR11-201 (पुणे शहरात स्वच्छ प्रभाग स्वच्छता स्पर्धांचे आयोजन करणे.) र.रू.१०.०० लाख या अर्थशिर्षकाखाली निधी उपलब्ध आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून रक्कम रू. १० लाख निधी लॉकिंग करून देणेत आलेले आहे. यामधून घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत वरील 'क' प्रमाणे स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धेत निवड करणेत आलेल्या वस्तीस प्रथम क्रमांकास रक्कम रू.०४ लाख, द्वितीय क्रमांकास रक्कम रू.०३ लाख, तृतीय

...३//

क्रमांकास रक्कम रू.०२ लाख, उत्तेजनार्थ क्रमांकास रक्कम रू.५० हजार व स्पर्धा बक्षीस वितरण कार्यक्रमाकरीता रक्कम रू.५० हजार खर्च करणेत येईल. वरीलप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत वितरीत करणेत येणाऱ्या बक्षीसाची रक्कम संबंधित निवड करणेत आलेल्या वस्तीतील नागरिकांनी सुचविलेल्या बचत गटांच्या नावे आर.टी.जी.एस. द्वारा रक्कम जमा करून वस्तीतील विविध विकास कामे, उपक्रमांकरीता वापरता येईल.

स्पर्धेचा कालावधी स्पर्धेचे स्वरूप, नियम, अटी शर्ती, अर्जाचा नमुना इ. बाबी सोबत जोडले आहेत.

अति. महापालिका आयुक्त (वि.)
पुणे महानगरपालिका

**प्रत कृपया अवलोकनार्थ व माहितीसाठी –**

१) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका
२) मा. अति. महापालिका आयुक्त (ज./इ./वि.), पुणे महानगरपालिका

**प्रत कृपया अंमलबजावणीसाठी –**

१) मा. सह महापालिका आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग
२) मा. उप आयुक्त, समाज विकास विभाग
३) मा. सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४
४) मा. उप आयुक्त (परिमंडळ क्र. १, २, ३ व ५)
५) मा. महापालिका सहाय्यक आयुक्त (क्षेत्रिय कार्यालय १ ते १५)
पुणे महानगरपालिका

(सुनिल इंदलकर)
**उप आयुक्त**
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

**सोबत** – परिशिष्ट 'अ' व वेळापत्रक

पुणे महानगरपालिका
'स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धा'
सन २०१९-२०२०
वेळापत्रक

| अ. क्र. | दिनांक | कार्यक्रमाचे नियोजन |
|---|---|---|
| १. | दि.१५ जानेवारी ते दि.२० जानेवारी २०२० | स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धा विषयक अर्ज मागविणे. |
| २. | दि.२२ जानेवारी ते २२ फेब्रुवारी २०२० | स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धा विषयक संबंधित खात्यामार्फत नियोजित कार्यक्रम राबविणे. |
| ३. | दि.२३ फेब्रुवारी ते दि.२५ फेब्रुवारी २०२० | वस्ती पातळीवरील व क्षेत्रिय कार्यालयाकडील परीक्षण |
| ४. | दि.२६ फेब्रुवारी ते दि.२७ फेब्रुवारी २०२० | शहर पातळीवरील परीक्षण |
| ५. | दि.४ मार्च २०२० | पारितोषिक वितरण समारंभ |

उपआयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

D:\NEW_UCD3\Chavan Sir\ola suka kacharababat.doc

# समाज विकास विभाग
# पुणे महानगरपालिका
# स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धा
# परिशिष्ठ 'अ'

➢ **स्वरूप :–** पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत स्वच्छ सर्वेक्षण २०१९–२०२० अंतर्गत पुणे मनपा प्रभागनिहाय स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धा आयोजित करणेत येणार आहे. यामध्ये स्वच्छता विषयक जाणीव जागृती करणेकरीता विविध कार्यक्रम, उपक्रम, स्पर्धा पारितोषिक वितरण कार्यक्रम आयोजित करणेत येणार आहे.

➢ **कोण सहभागी होणार :–** पुणे शहरातील झोपडपट्टीतील स्थानिक मंडळ/बचत गट/शेजार समुह गट

➢ **नियम व अटी :–**

१. सदर स्पर्धा पुणे महानगरपालिका हद्दीतील सर्व वस्तीपातळीवर लागू राहील.
२. स्पर्धा नोंदणी अर्ज मुदतीत भरणे आवश्यक राहील. मुदतबाह्य अर्जांची नोंद घेणेत येणार नाही.
३. वस्तीतील कुटुंब संख्येच्या किमान ६०% शेजार समूह गट/बचत गट/स्थानिक मंडळ सहभाग असणे आवश्यक आहे.
४. सहभागी गटातील सभासदांनी ओला व सुका कचरा वेगळा करून ठेवणे तसेच कचरा वेचक, संस्था अथवा कलेक्शन सेंटर वर देणे बंधनकारक आहे.
५. वस्तीमध्ये ओला कचरा वर्गीकरण करण्याकरीता प्रबोधन करणे व अन्य कुटुंबांना प्रोत्साहन करणे.
६. ओला व सुका कचरा प्रत्येक घरटी कचरा वेचकांकडे देणे अथवा कलेक्शन सेंटर वर देण्यासाठी प्रोत्साहित करणे.
७. कचऱ्यापासून खत निर्मिती अथवा पर्यावरणपूरक प्रकल्पांमध्ये वस्ती सहभागी झाल्यास त्यांना गुणांकनामध्ये १० बोनस गुण देणेत येतील.
८. पाण्याचा वापर काटकसरीने करणे.
९. सहभागी शेजार समूह गट/बचत गट/स्थानिक मंडळ यांनी पुणे मनपाच्या स्वच्छता ॲपचा वापर १००% करणे बंधनकारक राहील.
१०. सार्वजनिक शौचालयाचा वापर करणेस पुढाकार. तसेच वस्तीतील इतर नागरिकांना प्रोत्साहित करणे.
११. सार्वजनिक शौचालयाची स्वच्छता व दुरुस्ती याबाबत स्वच्छता ॲपवर तक्रारी दाखल करणे व नोंदी ठेवणे.
१२. वस्ती निहाय सार्वजनिक स्वच्छता समिती (संबंधित प्रभागातील मा. सभासद, प्रतिष्ठित व्यक्ती, सार्वजनिक मंडळ अध्यक्ष, बचत गट स्वयंसेविका, वस्तीतील नागरिक यापैकी किमान ५ व्यक्तींची समिती) स्थापन करणे आवश्यक राहील.
१३. उघड्यावर शौचास, उघड्यावर कचरा फेकणेस संबंधित सहभागी सदस्यांची तक्रार नसावी. अथवा वस्तीमध्ये असे प्रकार होऊ नयेत.
१४. सार्वजनिक ड्रेनेज व्यवस्था स्वच्छ ठेवणे.
१५. स्वच्छता जाणीव जागृती बाबत स्थानिक नागरिकांनी बैठका, प्रचार फेरी, प्रभात फेरी व तत्सम उपक्रम वस्तीमार्फत राबविलेबाबतचे पुरावे जोडणे आवश्यक राहील.

...२//

➢ काय काय करायचे :-

१. स्वच्छ झोपडपट्टी संदर्भांत बैठका, प्रचार फेरी, प्रभात फेरी व तत्सम उपक्रम वस्तीमार्फत आयोजित करून जाणीव जागृती करणे.

२. स्पर्धा कालावधीत ओला व सुका कचरा प्रत्येक कुटुंबाने वेगळा करून ठेवणे व वेगळा देणे.

३. ओला व सुका कचरा प्रत्येक घरटी कचरा वेचकांकडे देणे अथवा कलेक्शन सेंटर वर देणे.

४. पुणे महानगरपालिकेच्या स्वच्छता ॲपवर शेजार समूह गट/बचत गट/स्थानिक मंडळ यांची नोंद करणे व वस्ती पातळीवर नागरिकांना स्वच्छता ॲपचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित करणे.

५. सार्वजनिक शौचालयाचा वापर करणे. तसेच वस्तीतील इतर नागरिकांना प्रोत्साहित करणे.

६. सार्वजनिक स्वच्छता अभियान (श्रमदान) राबविणे.

७. प्रतिबंधीत प्लॅस्टिकचा वापर न करणे.

८. पाण्याचा वापर काटकसरीने करणे.

➢ **सलग्न मदत काय लागणार आहे :-** घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून स्वच्छ झोपडपट्टी संदर्भांत हॅन्डबील, बॅनर, श्रमदानासाठी लागणारे साहित्य, पथनाट्य सादर करणारे पथक, तसेच घनकचरा व्यवस्थापन करण्याकरीता काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांची मदत

➢ **परिक्षण समिती :-** स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धा तपासणी करीता क्षेत्रिय कार्यालय निहाय खालीलप्रमाणे समिती गठित करणेत येत आहे.

| अ. क्र. | समिती तपशील |
|---|---|
| १. | मा. प्रभाग समिती अध्यक्ष |
| २. | विभागीय परिमंडळ क्र. १ ते ५ कडील वैद्यकिय अधिकारी |
| ३. | विभागीय आरोग्य निरीक्षक |
| ४. | स्थानिक संस्था प्रतिनिधी (स्वयंसेवी संस्था) |
| ५. | सहाय्यक समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग |
| ६. | समाजसेवक |

➢ **बक्षिस :-**

१. सदर स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धेत १५ क्षेत्रिय कार्यालय पातळीवर प्रत्येकी ३ या प्रमाणे ४५ झोपडपट्ट्यांची निवड करणेत येणार आहे.

२. या ४५ झोपडपट्ट्यांपैकी शहर पातळीवर पुणे मनपा परिमंडळ विभागीय कार्यालयनुसार ५ झोपछडपट्ट्यांची प्रथम क्रमांकाने, ५ झोपडपट्ट्यांची द्रितीय क्रमांकाने, ५ झोपडपट्ट्यांची तृतीय क्रमांकाने निवड करणेत येणार आहे. प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या झोपडपट्टीस रक्कम रू. १५ लाख, द्रितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या झोपडपट्टीस रक्कम रू. १० लाख, तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या झोपडपट्टीस रक्कम रू. ५ लाख पारितोषिक व प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह अदा करणेत येईल. सदर

...३//

पारितोषिकाच्या रक्कमेमधून ही त्या त्या झोपडपट्ट्यांतील नागरिकांनी सुचविलेली विकास कामे त्या त्या क्षेत्रिय कार्यालयांमार्फत करणेत येईल. या करिता सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकामध्ये तरतूद करणेत येईल.

३. स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धेत प्रथम क्रमांकाने निवड झालेल्या वस्तीत काम करणाऱ्या समुहसंघटिका यांना प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| मुकुंदा भि. महाजन | रामदास चव्हाण | (सुनिल इंदलकर) |
| उप समाज विकास अधिकारी | समाज विकास अधिकारी | उप आयुक्त |
| समाज विकास विभाग | समाज विकास विभाग | समाज विकास विभाग |
| पुणे महानगरपालिका | पुणे महानगरपालिका | पुणे महानगरपालिका |

(५४)

# पुणे महानगरपालिका
## 'स्वच्छ झोपडपट्टी स्पर्धा' करीता अर्ज
## सन २०१९-२०२०

- क्षेत्रिय कार्यालयाचे नाव :- ____________________
- प्रभाग क्र. :- ____________________ प्रभाग नाव :- __________
- वस्तीचे नाव व पत्ता :- ____________________
- वस्तीतील कुटुंबांची संख्या :- ______
- सहभाग नोंदविणारे बचत गट संख्या :- ______
- बचत गट नाव :- ____________________
- बचत गट संघटिका नाव :- ____________________
- बचत गट संघटिका मोबाईल नं. :- ____________________

स्वाक्षरी :- ____________________

उपआयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

**नियम व अटी :-**

१) **स्पर्धा नोंदणी** अर्ज मुदतीत भरणे आवश्यक राहील. मुदतबाह्य अर्जांची नोंद घेणेत येणार नाही.

२) **स्पर्धा** कालावधीत वस्तीतील कुटुंब संख्येच्या किमान ६०% शेजार समूह गट/बचत गट/स्थानिक मंडळ सहभाग असणे आवश्यक आहे.

३) स्पर्धा कालावधीत ओला व सुका कचरा प्रत्येक कुटुंबाने वेगळा करून ठेवला असल्यास अथवा दिला असल्यास त्यांना प्राधान्य दिले जाईल.

४) स्पर्धा कालावधीत कचऱ्यापासून खत निर्मिती अथवा पर्यावरणपूरक प्रकल्पांमध्ये वस्ती सहभागी असल्यास त्यांना प्राधान्य दिले जाईल.

५) स्पर्धा कालावधीत पाण्याचा वापर काटकसरीने करणाऱ्या वस्तीस प्राधान्य दिले जाईल.

६) पुणे महानगरपालिकेच्या स्वच्छता ॲपवर शेजार समूह गट/बचत गट/स्थानिक मंडळ यांची नोंद बंधनकारक राहील.

७) सार्वजनिक शौचालयाची स्वच्छता व दुरूस्ती या वर स्थानिक नागरिकांचे सहभाग असणे आवश्यक राहील व त्या संबंधित पुरावा (स्वच्छता ॲपवरील तक्रार/लेखी तक्रार केली असल्यास) जोडणे आवश्यक राहील.

८) वस्ती निहाय सार्वजनिक स्वच्छता समिती (संबंधित प्रभागातील मा. सभासद, प्रतिष्ठित व्यक्ती, सार्वजनिक मंडळ अध्यक्ष, बचत गट स्वयंसेविका, किमान वस्तीतील १० नागरिक) असणे बंधनकारक राहील.

९) स्पर्धा कालावधीत उघड्यावर शौचास, उघड्यावर कचरा फेकणेस संबंधित समितीतील व्यक्तींची तक्रार नसावी.

१०) सार्वजनिक ड्रेनेज व्यवस्था स्वच्छ ठेवणे करीता समितीची देखरेख असणे आवश्यक राहील.

११) स्पर्धा कालावधीत स्वच्छता जाणीव जागृती बाबत स्थानिक नागरिकांनी बैठका, पथनाट्य, प्रचार फेरी, प्रभात फेरी व तत्सम उपक्रम वस्तीमार्फत राबविले असल्यास त्यांना प्रथम प्राधान्य राहील. त्याबाबतचे पुरावा जोडणे बंधनकारक राहील.

उपआयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

## गुणांकन तक्ता

क्षेत्रिय कार्यालयाचे नाव :- ____________

प्रभाग क्र. :- ____________

प्रभाग नाव :- ____________

वस्तीचे नाव व पत्ता :- ____________

बचत गट नाव :- ____________

बचत गट संघटिका नाव :- ____________

बचत गट संघटिका मोबाईल नं. :- ____________

| अ. क्र. | तपशील | एकूण गुण | प्राप्त गुण | शेरा |
|---|---|---|---|---|
| अ. | **स्वच्छता** | | | |
| १. | गल्ली स्वच्छता<br>लोकसहभागातून<br>स्वतः | <br>१०<br>५ | | |
| २. | गेल्या महिन्यात बचत गटद्वारे वस्तीमध्ये आयोजित केलेल्या स्वच्छता मोहिमेची संख्या<br>(२ पेक्षा जास्त)<br>(१ ते २) | <br><br>७<br>२ | | |
| ब. | **घनकचरा** | | | |
| ३. | घरोघरी कचरा संकलन केले जाते का?<br>१००% घरगुती<br>५०-९९% घरगुती<br>५०% पेक्षा | <br>१०<br>५<br>० | | |
| ४. | घरोघरी कचरा संकलनासाठी सहभाग शुल्क दिले जाते का?<br>१००% घरगुती<br>५०-९९% घरगुती<br>५०% पेक्षा | <br><br>१०<br>५<br>० | | |
| ५. | ओला व सुका कचरा वेगळा केला आहे?<br>१००% कचऱ्याचे वर्गीकरण केले जाते का?<br>५०-९९% कचऱ्याचे वर्गीकरण केले जाते का?<br>५०% पेक्षा कमी कचऱ्याचे वर्गीकरण जाते का? | <br>१०<br>५<br>० | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | कंपोस्टिंग घर संख्या<br>१०% घरगुती<br>५-१०% घरगुती | <br>५<br>३ | | |
| ७. | झोपडपट्टीच्या सभोवतालची मोकळ्या जागा/ठिकाणे स्वच्छता | ५ | | |
| **क.** | **पाणी पुरवठा** | | | |
| ८ | प्रत्येक घरात पाणी पुरवठा आहे का?<br>सार्वजनिक नळकोंडाळे<br>हो<br>नाही | <br><br>३<br>० | | |
| ९. | पाणी बचत करतात का?<br>हो<br>नाही | <br>५<br>० | | |
| **ड.** | **शौचालयाचा वापर** | | | |
| १०. | शौचालय आहे का?<br>वैयक्तिक<br>सार्वजनिक<br>सामुहिक | <br>५<br>३<br>२ | | |
| ११. | शौचालय स्वच्छ आहे का?<br>आहे<br>नाही | <br>१०<br>० | | |
| १२. | देखभाल यंत्रणा<br>संस्थेच्या कर्मचाऱ्यामार्फत शौचालय स्वच्छ राखले जाते का?<br>पुणे महानगरपालिकेचे कर्मचारी मार्फत शौचालय स्वच्छ राखले जाते का?<br>राखण्यसाठी कोणीही नाही | <br>३<br>३<br>० | | |
| १३. | शौचालय सहभाग शुल्क भरणारे घर<br>१००% ग्राहक शुल्क देतात.<br>५०-९९% ग्राहक शुल्क देतात.<br>५०% पेक्षा कमी ग्राहक शुल्क देतात. | <br>५<br>२<br>० | | |
| १४. | वस्तीत उघड्यावर शौचास बसले जाते का?<br>होय<br>नाही | <br>०<br>५ | | |
| १५. | भंगार दुकाने/गॅरेज आहे का? | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कचरा दररोज उचलला जातो का?<br>हो<br>नाही | <br>५<br>० | | |
| इ. | **ड्रेनेज** | | | |
| १६. | रहिवासी चेंबरमध्ये कचरा टाकतात का?<br>हो<br>नाही | <br>०<br>५ | | |
| १७. | ड्रेनेज तुंबल्या जातात का?<br>नाही<br>हो | <br>५<br>० | | |
| ई. | **झोपडपट्टी सुधारणा प्रकल्प** | | | |
| १८. | झोपडपट्टीत पुणे मनपा मार्फत वस्तीत पुरविलेल्या सुविधा व वापर किती होतो. उदा. समाजमंदिर, मनपा शाळा, दवाखाना इ.<br>३ पेक्षा जास्त<br>१ ते २<br>शून्य | <br><br><br>१०<br>५<br>० | | |
| उ.<br>१९. | झोपडपट्टीत स्वच्छता समिती स्थापन केली का?<br>हो<br>नाही | <br><br>५<br>० | | |
| ऊ. | **जागरूकता निर्माण** | | | |
| २०. | स्वतःच्या पुढाकाराने कमीतकमी ५ सभा, बैठका, जनजागृतीपर कार्यक्रम, रस्त्यावर पथनाट्य आयोजित करणे (एका कार्यक्रमास कमीतकमी ५० नागरिकांची उपस्थिती आवश्यक)<br>५ पेक्षा जास्त<br>२ ते ४<br>१ | <br><br><br><br><br>१०<br>७<br>५ | | |
| २१. | स्थानिक मा. सभासद यांनी या स्पर्धेतील सहभाग<br>सहभाग घेतल्यास<br>सहभाग न घेतल्यास | <br><br>७<br>० | | |

सदर वस्ती पाहणी बचत गट/शेजार समूह गट/स्थानिक मंडळ यांच्या प्रतिनिधीं समवेत समितीने पाहणी केली असून त्यानुसार गटास गुण दिले आहे.

| अ. क्र. | परिक्षकाचे नाव | हुद्दा | सही |
|---|---|---|---|
| १. | | मा. प्रभाग समिती अध्यक्ष | |
| २. | | विभागीय परिमंडळ क्र. १ ते ५ कडील वैद्यकिय अधिकारी | |
| ३. | | विभागीय आरोग्य निरीक्षक | |
| ४. | | स्थानिक संस्था प्रतिनिधी (स्वयंसेवी संस्था) | |
| ५. | | सहाय्यक समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग | |
| ६. | | समाजसेवक | |
| ७. | | पत्रकार | |

उपआयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका